क्र.अमाशा/२०१६-१७/दीर्घसुट्या/माध्य अ (२८९)/ 2282
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,पुणे – ४११ ००१. दि. /४/२०१६.

06 APR 2016

प्रति,

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद,सर्व

२. शिक्षण निरीक्षक,मुंबई
(दक्षिण,उत्तर,पश्चिम)

**विषय - राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील सुट्टयांबाबत.**

राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातून उन्हाळयाची व दिवाळीची सुट्टी याबाबत सुसूत्रता राहावी म्हणून शिक्षण संचालनालयामार्फत दरवर्षी शैक्षणिक वर्षातील सुटयांची निश्चिती करण्यात येते. त्यानुसार सुट्टयांबाबत खालील सूचना आपण जिल्हयातील सर्व मान्यताप्राप्त शासकीय,अशासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व सैनिक शाळा यांना देण्यात याव्यात.

१. रविवार दिनांक १ मे २०१६ रोजी महाराष्ट्र दिन साजरा करुन त्यानंतर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांच्या नियोजनानुसार उन्हाळी सुट्टी लागू करण्याबाबत सूचना द्याव्यात.

२. शासन निर्णय क्र.संप्रप-२००६/(१३७/०६)/प्राशि-५,दि.२२ जून २००७ नुसार विदर्भ विभागातील शाळा उन्हाळयाच्या सुट्टीनंतर (दि.२६/६/२०१६ रोजी रविवार साप्ताहिक सुट्टी असल्याने) सोमवार दि.२७/६/२०१६ रोजी सुरु होतील. विदर्भ विभागाव्यतिरिक्त राज्यातील उर्वरित विभागातील शाळा उन्हाळी सुट्टीनंतर बुधवार दि.१५/६/२०१६ पासून सुरु होतील.

३. सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील दिवाळी सुट्टी शुक्रवार दि.२८/१०/२०१६ पासून सुरु करण्यात यावी.

४. शाळांना उन्हाळयाची व दिवाळीची दीर्घ सुट्टी कमी करुन त्याऐवजी गणेशोत्सव अगर नाताळ यासारख्या सणांचे प्रसंगी ती समायोजनाने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांचे परवानगीने घेता येईल. मात्र माध्यमिक शाळा संहिता नियम ५२.२ नुसार शैक्षणिक वर्षातील सर्व प्रकारच्या एकूण सुट्टया ७६ दिवसांपेक्षा जास्त होणार नाहीत,याची दक्षता घेण्यात यावी. तसेच एकूण कामाचे दिवस २३० होणे आवश्यक आहे.

५. मुख्याध्यापक यांच्या अखत्यारितील स्थानिक सुट्टया मुख्याध्यापकांनी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच निश्चित करुन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना कळवाव्यात. जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक जिल्हयासाठी निश्चित केलेल्या स्थानिक सुट्या तसेच शासन स्तरावरुन जाहीर करण्यात आलेल्या सर्व सार्वजनिक सुट्या शाळांनी घेणे बंधनकारक आहे. शासनाने जाहीर केलेल्या सुट्यांची यादी सोबत जोडली आहे.

६. विदर्भातील शाळा शेष महाराष्ट्रातील शाळांच्या तुलनेने उशिरा सुरु होत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे व्यापक शैक्षणिक हित लक्षात घेऊन सार्वजनिक सुट्या व दीर्घ मुदतीच्या सुट्या कपात करण्याची व राज्यातील अन्य भागांप्रमाणे शालेय दिवस निश्चित करण्याचा निर्णय संबंधित जिल्हयांचे शिक्षणाधिकारी (माध्य) यांनी घ्यावा. सर्व शासकीय सुट्या तसेच स्थानिक सुट्या विचारात घेऊन सुट्यांच्या कालावधीची निश्चितता झाल्यानंतर प्रत्येक शाळेत किमान २३० दिवस शालेय कामकाज चालेल, अशा पध्दतीने वार्षिक कालदर्शिका (कॅलेंडर) संबंधित शिक्षणाधिकारी यांनी तयार कराव्यात.

७. प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोगशाळा परिचर हे कर्मचारी वगळून इतर शिक्षकेत्तर कर्मचा-यांना दीर्घ सुट्या अनुज्ञेय नाहीत. मात्र दीर्घ सुट्टीच्या कालावधीत ज्या सार्वजनिक सुट्या असतील त्या शिक्षकेत्तर कर्मचा-यांना अनुज्ञेय राहतील.

८. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी सुट्यांच्या निश्चिततेबाबत संबंधित संघटनांची बैठक घेऊन सुट्टया निश्चित करण्यासाठी जून ते मे अखेर असे शैक्षणिक वर्ष विचारात घ्यावे.

९. राज्यातील धार्मिक सण व उत्सव इ. च्या कालावधीमध्ये परीक्षा घेणे व शाळांना सुटयांच्या नियोजनाबाबत शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२०६/एसडी-२,दि.८ सप्टेंबर २०१५ मध्ये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.(सोबत प्रत संलग्न)

उपरोक्त सूचनांनुसार सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात माध्यमिक शाळांना द्यावयाच्या सुटयाबाबतचे आदेश आपलेस्तरावरुन वेळेत निर्गमित करावेत व सदर आदेशाची प्रत संचालनालयास पाठविण्यात यावी.

**(एन.के.जरग)**
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

प्रत :- माहितीस्तव सादर

१. मा.प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई – ३२.
२. मा.आयुक्त,शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पुणे – १.

प्रत - माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

१. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य,पुणे – १.
२. संचालक,अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय,म.रा.पुणे – १.
३. संचालक,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे – ३०.
४. अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद,पुणे – १.
५. सचिव,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे.
६. विभागीय सचिव,मुंबई,पुणे,औरंगाबाद,नागपूर,अमरावती,कोल्हापूर,नाशिक,लातूर,रत्नागिरी.
७. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
८. सर्व पिठासीन अधिकारी,शाळा न्यायाधिकरण.